# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ३ रे अंक २२२ वा मंगळवार दि.०६ फेब्रुवारी २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# भारत तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल

नवी दिल्ली : लोकसभेत सोमवार दि. ५ फेब्रुवारी रोजी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर चर्चा सुरू झाली. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या दुस–या कार्यकाळातील शेवटच्या भाषणात विरोधकांवर जोरदार टीका केली. माझ्या तिस–या टर्ममध्ये भारत तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल, असा दावा पंतप्रधान मोदींनी यावेळी केला.पंतप्रधान मोदी म्हणाले की १० वर्षांच्या शासनाचा अनुभव, आजची मजबूत अर्थव्यवस्था आणि भारत ज्या वेगाने प्रगती करतोय, ते पाहता मी विश्वासाने सांगतो की, आमच्या तिस–या कार्यकाळात भारत जगातील तिसरी सर्वात मोठी आर्थिक शक्ती बनेल. ही मोदींची गॅरेंटी आहे. आमची तिसरी टर्म मोठ्या निर्णयांनी भरलेली असेल. मी राममंदिर सोहळ्यात सांगितले होते की, मला पुढील हजार वर्षे देशाला समृद्धीच्या शिखरावर पाहायचे आहे. तिसरी टर्म पुढील १००० वर्षांसाठी मजबूत पाया घालण्याची असतील. संपूर्ण देश म्हणत आहे, यावेळी ४०० पार. जनता भाजपला ३७० जागा आणि एनडीएला ४०० जागा देईल.आमच्या सरकारने शेकडो कायदे रद्द केले, अमृत भारत आणि नमो भारत ट्रेनने भारत प्रगतीच्या मार्गावर आला. प्रभू रामाचे मंदिर भारताच्या महान सांस्कृतिक परंपरेला ऊर्जा देत राहील.



विरोधी पक्ष म्हणून जबाबदारी पार पाडण्यात ते (विरोधक) अपयशी ठरले. आज देशात ज्या वेगाने काम सुरू आहे, काँग्रेस सरकार या गतीची कल्पनाही करू शकत नाही. आम्ही गरीबांसाठी ४ कोटी घरे आणि शहरी गरिबांसाठी ८० लाख पक्की घरे बांधली. काँग्रेसच्या गतीने ही घरे बांधली असती, तर एवढे काम पूर्ण व्हायला १०० वर्षे लागली असती.सरकारने अनेक योजना सुरू केल्या करप्रणाली सुलभ करण्यासाठी जीएसटीसारखे निर्णय घेण्यात आले. जनतेने आम्हाला पूर्ण पाठिंबा दिला आणि दुस–या टर्ममध्ये आधीपेक्षा जास्त आशीर्वाद दिले. दुसरी टर्म म्हणजे आश्वासनांच्या पूर्ततेची मुदत होती. देशाच्या ताकदीवर आमचा विश्वास आहे. आमचा लोकांच्या शक्तीवर विश्वास आहे. देशातील जनतेने आम्हाला पहिल्यांदा सेवेची संधी दिली, तेव्हा आम्ही यूपीएने केलेली पोकळी भरुन काढली. दुस–या टर्ममध्ये नव्या भारताचा पाया रचला. उज्ज्वला, आयुष्मानसह अनेक योजना सुरू केल्या. महिला शक्ती, युवा शक्ती, देशातील गरीब बंधू–भगिनी आणि शेतकरी, ज्यामुळे विकसित भारताचे ध्येय पूर्ण होईल, असा विश्वास मोदींनी यावेळी व्यक्त केला. विरोधकांनी धैर्य गमावले मी पाहतो की तुमच्यातील अनेक लोकांनी निवडणूक लढवण्याचे धैर्य गमावले आहेत. मी ऐकले आहे की, अनेक लोक त्यांच्या जागा बदलण्याचा विचार करत आहेत. अनेकांना आता लोकसभेऐवजी राज्यसभेवर जायचे आहे. विरोधकांच्या या अवस्थेला काँग्रेस जबाबदार आहे. देशाला निरोगी आणि चांगल्या विरोधी पक्षाची नितांत गरज आहे. काँग्रेसमध्ये इतर कोणत्याही नेत्याचा प्रचार झाला नाही. देशाला घराणेशाहीचा फटका बसला आहे. काँग्रेसच्या दुकानाला टाळे लावण्याची वेळ आली. काँग्रेसच्या याच मानसिकतेमुळे देशाचे खूप नुकसान झाले आहे. काँग्रेसने नेहमीच एकाच कुटुंबावर विश्वास ठेवला आहे. त्यांनी आपल्या कुटुंबासमोर कुणाचाही विचार केला नाही, असा घणाघातही त्यांनी यावेळी केला.

# अल्पवयीन मुलावरील अत्याचार प्रकरणी आरोपीस जन्मठेप

परभणी : दहा वर्षीय अल्पवयीन मुलावर अनैसर्गिक अत्याचार केल्याबद्दल सय्यद अन्सार सय्यद सईद (रा. अब्दुल रहिम नगर) या आरोपीस प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यु.एम. नंदेश्वर यांनी सोमवार, दि.५ फेब्रुवारी रोजी कलम ६ पोक्सो अन्वये जन्मठेप, १० हजार रुपये दंड, दंड न भरल्यास एक वर्ष साधी कैद, भादंवि कलम २६३ अन्वये पाच वर्षे कैद, १ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास ३ महिने साधी कैद व कलम ५०६ अन्वये ५ वर्षे कैद, एक हजार रुपये दंड, दंड न भरल्यास तीन महिने साधी कैद अशी शिक्षा ठोठावली.कोतवाली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका अल्पवयीन मुलास सय्यद अन्सार सय्यद सईद याने दगड मारुन जखमी केले व उपचार करण्याच्या बहाण्याने त्यास सरकारी दवाखानामार्गे दर्गाह रस्त्यावरील कालव्याकडे नेले. कालव्याकडील पूलाजवळ तेथील एका टीनशेडच्या बाजूला असणा–या स्वच्छतागृहात अनैसर्गिक अत्याचार केला. त्या भागात राहणा–या एका महिलेने मुलाच्या ओरडण्यावरुन त्याठिकाणी धाव घेतली. त्यावेळी तीने आरोपी पिडीतावर अत्याचार करत होता हे पाहिले. तेव्हा त्या महिलेने त्या आरोपीस मारहाण केली. इतर नागरीकांना बोलावून पोलिसांच्या स्वाधीन केले. दरम्यान, पिडीतेच्या आईने दिलेल्या तक्रारीवरुन कोतवाली पोलिसांनी या प्रकरणात संबंधित मुलाची, आरोपीची वैद्यकीय तपासणी केली. दोघांच्या गुप्तांगावर आढळून आलेल्या जखमा, कपड्यावरील रक्त तपासणीसाठी रासायनिक प्रयोगशाळेकडे पाठविले. पोलिस निरीक्षक शरद जराड यांनी पोलिस हेड कॉन्स्टेबल विशाल गायकवाड यांच्या मदतीने तपास करीत विशेष न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती नंदेश्वर यांच्या न्यायालयात हा खटला चालला. एकूण १० साक्षीदार तपासण्यात आले. त्यामध्ये प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पिडीत मुलगा व सोडविणारी महिला यांची साक्ष, घटनास्थळावरुन जप्त केलेल्या तेलाच्या बॉटलीसह शर्टवरील रक्ताचे नमूने या गोष्टींचे अहवाल सूनावनी दरम्यान सादर केल्यानंतर डीएनएच्या अहवालात ते रक्त पिडीताचेच असल्याचे सिध्द झाल्यानंतर न्यायालयाने प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, वैद्यकीय अधिकारी, रासायनिक विश्लेषक यांची साक्ष ग्रा धरुन संबंधित आरोपीस जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. मुख्य सरकारी वकील ज्ञानोबा दराडे यांनी सरकार पक्षातर्फे बाजू मांडली. अभिलाषा पाचपोर यांनी त्यांना मदत केली. पोलिस

# भारतीय जनता पार्टीच्या वतीने दिनांक ४ ते ११ फेब्रुवारी दरम्यान लातूर लोकसभा मतदारसंघात गाव चलो अभियान राबवण्यात येत आहे.

चाकूर :– भारतीय जनता पार्टीच्या वतीने दिनांक ४ ते ११ फेब्रुवारी दरम्यान लातूर लोकसभा मतदारसंघात गाव चलो अभियान राबवण्यात येत आहे.मतदारसंघातील लोकप्रतिनिधी आणि पदाधिकारी नेमून दिलेल्या गावांमध्ये मुक्कामी राहणार आहेत. तसेच शहरी भागात वार्डनिहाय हे अभियान राबविले जाईल. या अभियानात युनिट्स मध्ये भाजपचे नेते प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचणार आहेत. पक्षाचे आजी व माजी खासदार, आमदार, जिल्हा परिषद सदस्य असे अनेक मान्यवरासह सुपर वॉरियर्सच्या सहकार्याने सर्व नेते मंडळी प्रत्येक युनिटमध्ये प्रवास करत आहेत. यामधून बूथप्रमुखांच्या बैठका, नागरिकांच्या भेटी, नवमतदारांशी चर्चा असे आखून दिलेली १८ संघटनात्मक कामे करण्यात येतील. यामध्ये माननीय नरेंद्रजी मोदी प्रधानमंत्री यांच्या विकसित भारत २०४७ च्या संकल्पने अंतर्गत नुकताच झालेल्या जी –२० परिषदेच्या अध्यक्ष निवडीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेचा सकारात्मक परिणाम होत आहे. केंद्रीय अर्थसंकल्प २०२४– २५ मध्ये याबाबतची सविस्तर माहिती आणि महायुती सरकारने केलेल्या सर्व कामांची सविस्तर माहिती देण्यात आली. लातूर लोकसभा मतदारसंघात २०१९ ते २०२४ या कार्यक्रमात केलेल्या सामाजिक आणि विकास कामांची लातूर लोकसभा विकास पर्व या माहिती पुस्तिका सर्वांना वितरित करण्यात आल्या. या प्रसंगी लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष – श्री. दिलीपमालक देशमुख, प्रदेश प्रवक्ते – श्री. गणेशजी हाके, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष – श्री. बालाजी पाटील चाकूरकर तसेच चाकुर तालुका अध्यक्ष – श्री. वसंतरावजी डिगोळे आदीसह कार्यकर्ते उपस्थित होते.




# बेपत्ता मुलींला शोधण्यात यश. पोलीस ठाणे औसा ची २४ तासात कारवाई.

लातूर :– बेपत्ता मुलींला शोधण्यात यश. पोलीस ठाणे औसा ची २४ तासात कारवाई. याबाबत थोडक्यात हकीकत अशी की, दिनांक ३०/०१/२०२४ रोजी पोलीस ठाणे औसा येथे अल्पवयीन मुलीचा अपहरण झाल्याच्या तक्रारीवरून भादवि कलम ३६३ प्रमाणे अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यापासून संबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस नमूद मुलीचा शोध घेत होते परंतु ती मिळून येत नव्हती. पोलीस अधीक्षक श्री. सोमय मुंडे यांचे कडून सदर मुलींचा शोध घेण्यासाठी औसा पोलिसांना सूचना व मार्गदर्शन करण्यात आले होते. त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक श्री. सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी, औसा रामदास इंगवले यांचे मार्गदर्शनात औसा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुनील रेजीतवाड व त्यांच्या टीमने सदर गुन्ह्याचा तपास करीत असताना अपहरण झालेल्या मुली संदर्भात खूप काही उपयुक्त माहिती नसतानाही गोपनीय व सायबर सेल कडून मिळालेल्या माहितीचे बारकाईने विश्लेषण करून मिळालेल्या माहितीवरून सदर मुलींचा शोध घेऊन ती लातूर ते उमरगा बसने प्रवास करीत असताना बस मध्ये मिळून आली.त्याला ताब्यात घेण्यात आले. सायबर सेल कडून मिळालेल्या तांत्रिक माहितीच्या व गोपनीय माहितीच्या आधारावर पोलिस निरीक्षक सुनील रेजितवाड आणि टीम ने अतिशय तात्काळ कार्यवाही करत बेपत्ता मुलीचा अवघ्या २४ तासात शोध घेऊन तीला पालकांच्या स्वाधीन करण्यात आले. आरोपी मुलास अटक करण्यात आली आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री. सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी औसा रामदास इंगवले यांचे मार्गदर्शनात, औसा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुनील रेजितवाड, महिला पोलीस उपनिरीक्षक राठोड, पोलीस अमलदार भुरे, भन्डे, वाडकर, मंदाडे सायबर सेल चे संतोष देवडे,गणेश साठे यांनी विशेष परिश्रम घेतले आहे.



# काँग्रेसने तोंड बघून तर भाजपाने गरजू आणि पात्र लाभार्थ्यांना विविध योजनेचा प्रत्यक्ष लाभ दिला

लातूर दि.०५ :– काँग्रेसने आपल्या परिवाराचे आणि बगलबच्चाचेच हित साधले शासकीय योजना तोंड बघून देण्यात आल्या, मात्र केंद्रातील आणि राज्यातील भाजपा महायुती शासनाने गोरगरीब सर्वसामान्यांना केंद्रबिंदू मानून अनेक योजना सुरू केल्या आणि जो पात्र आहे जो गरजू आहे अशा सर्वांना थेट लाभ देण्याचे काम केले असे प्रतिपादन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले. लातूर तालुक्यातील मौजे भातखेडा येथील १ कोटी ३९ लक्ष रुपये खर्चाच्या विविध विकास कामाचे लोकार्पण आणि भूमिपूजन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते रविवारी सकाळी मोठ्या उत्साहाच्या वातावरणात पार पडला. यावेळी विविध वाजंत्रीच्या जल्लोषात फटाके फोडून आ. कराड यांचे ग्रामस्थांनी जोरदार स्वागत करण्यात आले. याप्रसंगी भाजपाचे जिल्हा सरचिटणीस विक्रमकाका शिंदे, तालुका अध्यक्ष बन्सी भिसे, संगायो समिती अध्यक्ष वैभव सापसोड, अमोल पाटील, गोविंद नरहरे, सुरेखा पुरी, मारुती शिंदे, हनुमंत गव्हाणे, सचिन साबदे, पांडुरंग बालवाड, अशोक बिराजदार भातखेडा येथील सरपंच उमेश बेद्रे, उपसरपंच संगीता काळे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की काँग्रेसने वर्षानुवर्ष सत्ता उपभोगली मात्र अनेक गावात मूलभूत सुविधाही पुरवू शकले नाहीत. उसाच्या टिपऱ्याचे राजकारण करून शेतकऱ्यांना वेटीस धरण्याचे पाप केले. बाहेरचा ऊस आणायचा आणि कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांचा वाढवायचा असे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत. तरुणांनी आपल्या हक्कासाठी विकासासाठी आणि न्यायासाठी काँग्रेसच्या आडवा आणि जिरवा या नीती विरोधात रस्त्यावर उतरले पाहिजे. आपल्या सर्वांच्या आशीर्वादाने मी आमदार झालो, भातखेडा गावच्या विकासासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही अशी ग्वाही देऊन नरेंद्रजी मोदी तिसऱ्यांदा देशाचे पंतप्रधान होणार हे सूर्यप्रकाशा इतके सत्य असून संपूर्ण देशात, राज्यात आणि गावागावात सर्वांगीण विकास कामाचा डोंगर निर्माण करणाऱ्या, विविध ऐतिहासिक निर्णय घेणाऱ्या भारतीय जनता पार्टीला जनतेने मोठे समर्थन द्यावे, साथ द्यावी असे आवाहन आ. रमेशआप्पा कराड यांनी केले. मौजे भातखेडा येथील जनसुविधा योजने अंतर्गत २२ लक्ष रुपयाच्या सिमेंट रस्ता, आमदार स्थानिक विकास निधीतून १० लक्ष रुपयाचे रस्ता मजबुतीकरण, तीर्थक्षेत्र विकास योजनेतून ९ लाखाचा सिमेंट रस्ता, मूलभूत सुविधा योजनेअंतर्गत ५ लक्ष रुपयांचा सिमेंट रस्ता, पंधराव्या वित्त आयोगा अंतर्गत ६ लक्ष रुपयाच्या नाली बांधकाम व पेव्हर ब्लॉक रस्ता, दलित वस्ती सुधार योजनेतून ५ लक्ष रुपयांच्या नाली बांधकाम व सिमेंट रस्ता, तांडा वस्ती सुधार योजनेअंतर्गत १० लक्ष रुपयाच्या सिमेंट रस्ता या सर्व कामाचे लोकार्पण आणि १८ लक्ष रुपये खर्चाच्या ग्रामपंचायत इमारत बांधकाम, आमदार निधीतून १० लक्ष रुपये खर्चाचे रस्ता मजबुतीकरण, तीर्थक्षेत्र विकास योजनेतून १५ लक्ष रुपये खर्चाचा सिमेंट रस्ता, केंद्र शासनाच्या जल जीवन मिशन अंतर्गत २५ लक्ष रुपये खर्चाच्या पाणी टाकीचे बांधकाम आणि पाईपलाईन, तांडा वस्ती सुधार योजनेअंतर्गत ४ लाख रुपयांची पाईपलाईन या सर्व कामाचे भूमिपूजन असे एकूण एक कोटी चाळीस लक्ष रुपये खर्चाच्या विविध विकास कामाचे लोकार्पण आणि भूमिपूजन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते करण्यात आले. त्याचबरोबर वैयक्तिक लाभाच्या योजनेतून मंजूर असलेल्या भातखेडा येथील लाभार्थ्यांना मोदी आवास योजनेअंतर्गत १८ घरकुल, ३५ शेतकऱ्यांना जनावराचा गोठा आणि संजय गांधी निराधार योजनेतून ४२ निराधारांना अनुदान मंजुरीचे पत्र आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी विक्रमकाका शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले तर सरपंच उमेश बेद्रे यांनी आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून झालेल्या विविध विकास कामाची सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी आदिनाथ मुळे, लक्ष्मण मुळे, रुपेश काळे, धनराज मुमाने, हनुमंत बोळेगावे, रजाक पठाण, शिवदास बेद्रे, दीपक कांबळे, रामेश्वर मुमाने यांच्यासह भाजपाचे लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते, पदाधिकारी भातखेडा आणि परिसरातील नागरिक, महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.





## संपादकीय....

# राजधानी दिल्ली : मराठी 'संकटमोचक' चर्चेत

चंडीगडच्या महापौरपदाची निवडणूक असो वा बिहारची सत्ता पुन्हा काबीज करण्याच्या विषय असो, याची सूत्रे सांभाळली ती विनोद तावडे यांनी. राष्ट्रीय राजकारणात मोदी-शहांना अपेक्षित असलेला 'मराठा नेता' म्हणून विनोद तावडे यांचे नाव पुढे येण्याची शक्यता यामुळे निर्माण झाली आहे.चंडीगडमध्ये काँग्रेस आणि आम आदमी पार्टीकडे बहुमत असूनही कट कारस्थान करत भाजपचा महापौर होणे, हा प्रकार लोकशाही आणि आदर्श निवडणूक आचारसंहितेला चिरडणारा आहे. साध्या महापौरपदाची निवडणूकही पारदर्शकपणे होऊ दिली जात नाही, तर लोकसभेत काय होईल, असेही विचारले जाऊ लागले आहे. याबाबत विरोधकांकडूनच नव्हे तर विवेकवादी मतदारांकडून मते व्यक्त व्हायला लागली आहेत.परंतु जेव्हा पक्षनिष्ठा सर्वोच्चस्थानी असते तेव्हा काय चांगले अन् काय वाईट हा विषय त्या राजकारण्याच्या दृष्टीने गौण ठरतो. काल- परवाची चंडीगडची महापौरपदाची निवडणूक असो वा बिहारची सत्ता पुन्हा काबीज करण्याच्या विषय असो, याची सर्व सूत्रे सांभाळली ती विनोद तावडे यांनी त्याच भूमिकेतून.त्यात त्यांनी इमानेइतबारे काम केले आणि राष्ट्रीय राजकारणात मोदी-शहांना अपेक्षित असलेला 'मराठा नेता' हे स्थान मिळविण्याचा प्रयत्न ते करीत असल्याचे दिसून आले. पक्षाला अपेक्षित यश मिळवून दिल्यावरही तावडे त्याचे श्रेय स्वत:कडे घेत नाहीत. ही बाब भविष्यातील राजकारणबदलाचे चिन्ह आहे.पाच वर्षांपूर्वी विधानसभेचे तिकीट न मिळाल्यानंतर राजकारणात अंग चोरून वावरणारे आणि शांतपणे खदखद व्यक्त करणारे तावडे हे भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस, सोबतच आधी हरयाना आणि आता बिहारचे प्रभारी आहेत. लोकसभा निवडणुकीसाठी उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश आणि छत्तीसगडचे समन्वयक म्हणून त्यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. पक्ष त्यांच्यावर विश्वास टाकतो आहे.या निमित्ताने पुन्हा एकदा दिल्लीतील महाराष्ट्राचे स्थान हा विषय चर्चेत आला आहे. दिल्लीचे महाराष्ट्राला नेहमीच आकर्षण असते. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मराठ्यांनी उत्तरेच्या मोहिमा काढत दिल्लीचे तख्त काबीज केले. महाराष्ट्राचे दिल्लीच्या राजकारणातील महत्त्व अठराव्या शतकात इतके मोठे होते, की दिल्लीचा बादशाहा कोण होणार? हे शिंदे-होळकर ठरवत असत, असे म्हटले जाते.यावरूनच 'दिल्लीचेही तख्त राखतो महाराष्ट्र माझा' ही कविकल्पना पुढे आली. आजही दिल्लीचे तख्त काबीज करण्याचे मराठी माणसाचे स्वप्न असते. इतिहासत पानिपतच्या लढाईत मराठा साम्राज्याची वाताहात झाली आणि महाराष्ट्राचा दिल्लीवरचा दबदबा कमी झाला. स्वातंत्र्यानंतर तर दिल्ली महाराष्ट्रावर अन्याय करते, अशी एक भावना तयार झाली. ब्रिटिश राजवटीत रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर बनलेले सी. डी. देशमुख नंतर १९५०मध्ये केंद्रीय अर्थमंत्री बनले आणि त्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेच्या रचनेवर मोठा प्रभाव टाकला. मुंबई गुजरातला जोडण्याच्या प्रस्तावाविरोधात त्यांनी संयुक्त महाराष्ट्राची बाजू घेतली आणि आपल्या पदाचा राजीनामा दिला. संयुक्त महाराष्ट्राचा 'मंगलकलश' घेऊन येणारे यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्रातच नव्हे, तर दिल्लीच्या राजकारणातही एक मोठे नाव होते. ते काही काळ भारताचे उपपंतप्रधान तर झालेच; पण भारत-चीन युद्धाच्या पार्श्वभूमीवर त्यांना संरक्षणमंत्री म्हणून नियुक्त करण्यात आले. प्रतिभाताई पाटील या भारताच्या राष्ट्रपती झाल्या, हा मराठी माणसाचा दिल्लीच्या राजकारणातील एक सर्वोच्च बिंदू मानला जातो. नंतर काही काळ दिल्लीतील मराठी धुरीणांचा प्रभाव उत्तरोत्तर ओसरत गेला.पुढे शरद पवार यांनी संरक्षणमंत्री, केंद्रीय कृषिमंत्री अशी झेप घेतली असली तरी पंतप्रधानपदाने त्यांना हुलकावणी दिली. असे असले तरी शरद पवार हे राष्ट्रीय राजकारणात आजही स्वत:चा दबदबा ठेवून आहेत. शंकरराव चव्हाण, शिवराज पाटील चाकूरकर, सुशीलकुमार शिंदे यांनीही दिल्ली दरबारात आपल्या वकुबानुसार कामगिरी केली. भाजपचा उदय झाल्यानंतर महाराष्ट्रातून केंद्रीय स्तरावर झपाट्याने पुढे आलेले नाव म्हणजे स्व. प्रमोद महाजन यांचे.किंबहुना अटलबिहारी वाजपेयी यांचे सरकार बनण्यात त्यांच्या मुत्सद्दी खेळींचा मोठा वाटा होता. दिल्लीतील सूत्रे मुंबईतून हलू लागावीत, एवढा दबदबा त्यांनी अल्पावधीत निर्माण केला होता. भावी पंतप्रधान असे त्यांच्याबद्दल म्हटले जायचे; पण त्यांची दुर्दैवी हत्या झाली. विलासराव देशमुख हे एक महत्त्वाचे नाव. महाराष्ट्राचे दोनदा मुख्यमंत्री होते. त्यांनी केंद्रीय मंत्रिपद भूषवले.पण आजारपणामुळे दिल्लीच्या राजकारणात त्यांना खास दबदबा निर्माण करता आला नाही. प्रारंभी लातूरमधील निवडणुकीत आणि त्यानंतर विधानपरिषदेच्या निवडणुकीतही त्यांचा अल्पमताने पराभव झाला, तेव्हा ते म्हणाले होते, 'मी संपलेलो नाही, हे माझ्या राजकीय आयुष्याचे मध्यंतर आहे'. पुढे विलासराव मुख्यमंत्री झाले. २०१९मध्ये विनोद तावडे यांचे तिकीट कापले गेले. तेव्हा त्यांची राजकीय कारकीर्द संपली असे सर्वांना वाटले.त्यावेळी तावडेंनी सुरेश भटांची एक गाजलेली कविता सामाजिक माध्यमांवर प्रसिद्ध केली. 'विझलो आज जरी मी, हा माझा अंत नाही. पेटेन उद्या नव्याने, हे सामर्थ्य नाशवंत नाही....' या कवितेमुळे राज्यातील बलदंड नेत्यावर आरोप व्हायला लागले. पुढे तावडेंनी दिल्लीमध्ये हळूहळू आपले स्थान निर्माण केले. मराठी माणूस दिल्लीत रमत नाही, त्याचा एक पाय नेहमी महाराष्ट्रात अडकलेला असतो. तावडे काही वेगळे घडवितात का, हे पाहायचे.नितीन गडकरी यांचे दिल्लीतील राजकीय वजन कमी होण्याच्या चर्चा सुरू असताना प्रसिद्धीच्या झोतात न राहता तावडे यांनी मोदी सरकारचे 'संकटमोचक' म्हणून बिहारमध्ये जी भूमिका बजावली. त्यामुळे दिल्लीत त्यांचे वजन वाढल्याची चर्चा सुरू झाली आहे.बिहारमधील भाजपच्या खेळीमुळे 'इंडिया' आघाडीला जो हादरा बसला त्यातून ती कशी आणि कधी सावरेल याचे भाकीत आता वर्तवता येणे अवघड आहे.

# आज निवडणूक सूत्र: पैसा पेरा, राज करा!

भारतात निवडणूक आरंभ दिवस.

पहिल्या निवडणुकीबाबत या गोष्टी खास होत्या- १) सन १९५१-५२ साली प्रत्येक मतदान केंद्रांसाठी स्वतंत्र बॅलेट पेपर बॉक्सची सुविधा उपलब्ध होती. २) मतदाराला कोणत्याही मतदान केंद्रावर आपलं मत बॉक्समध्ये टाकण्याचं स्वातंत्र्य होतं. ३) कोणत्याही उमेदवाराला मतं देण्याचं स्वातंत्र्य पहिल्या निवडणुकीत देण्यात आलं होतं. यासंबंधीची ज्ञानवर्धक माहिती देत आहेत श्री.एन. के.कुमार जी. ती वाचा व प्रगल्भ व्हा.. संपादक.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लोकशाही पद्धतीने सरकार स्थापन करण्यासाठी सन १९५१-५२ साली भारतात पहिल्यांदा निवडणूक घेण्यात आली. या प्रथम निवडणुकीस फेब्रुवारी महिन्यात सुरूवात झाली आणि ती तब्बल ४ महिन्यानी संपली होती. तेव्हा भारतात आतासारखे सोशल मीडिया, टीव्ही किंवा जाहिरातींचा सुळसुळाटही नव्हता. त्याकाळात ईव्हीएमसारखं तंत्रज्ञानही नव्हतं. त्यामुळं प्रचारसभा, वृत्तपत्र, फलक, पत्रक वाटून आणि प्रत्येकाच्या घरी जाऊन प्रचार होत असे. स्वतंत्र भारतात त्या साली पहिली लोकसभा निवडणूक झाली. त्या निवडणुकीत एकूण देशातील ५४ राजकीय पक्ष सहभागी झाले होते. देशभरात १,८७४ उमेदवार निवडणुकीसाठी उभे होते.

भारतीय संविधानाच्या भाग १५मध्ये अनुच्छेद ३२४ ते अनुच्छेद ३२९पर्यंत निर्वाचनाची व्याख्या केली आहे. त्यांत निर्वाचनांचे अधीक्षण, निदेशन आणि नियंत्रण हे निर्वाचन आयोगमध्ये निहित आहे, असे सांगितले आहे. तसेच निर्वाचन आयोगाला निवडणूक संपन्न करण्याची जबाबदारी दिली आहे. सन १९८९पर्यंत निर्वाचन आयोग केवळ एक सदस्यीय संगठन होते. परंतु दि.१६ अक्टोबर १९८९ रोजी राष्ट्रपती अधिसूचनेद्वारे आणखी दोन निर्वाचन आयुक्तांची नियुक्ती केली गेली. सार्वजनिक पद धारण करण्यासाठी एक स्वतंत्र नेता निवडला जातो. ही एक औपचारिक निर्णय प्रक्रिया आहे. निवडणूक कधी कधी कार्यकारी अधिकारी, न्यायपालिका, प्रादेशिक आणि स्थानिक सरकारी यांसाठी घेतली जाते. विधिमंडळातील कार्यालये सदस्यांनी भरू शकतात. ही प्रक्रिया स्वयंसेवी संघटना, कंपन्या, क्लब, इतर अनेक खाजगी व व्यावसायिक संस्थामध्ये वापरली जाते. निवडणूक किंवा निर्वाचन- इलेक्शन ही लोकशाहीची एक महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे, ज्या द्वारे जनता आपल्या प्रतिनिधींना निवडते. निवडणूकांद्वारे आधुनिक लोकतंत्रचे लोक आमदार आणि कधी कधी न्यायपालिका आणि कार्यपालिका या विभिन्न पदांवर निवडून येण्यासाठी व्यक्तिंना निवडतात. यांद्वारे क्षेत्रीय आणि स्थानीय जागांसाठीही व्यक्तिंची निवड होते. वस्तुतः निवडणूकांचा प्रयोग व्यापक स्तरावर होत आहे आणि हे खाजगी संस्था, क्लब, विश्वविद्यालय, धार्मिक संस्था, इत्यादीमध्ये पण प्रयुक्त होत आहे. भारतीय लोकतंत्रात्मक निवडणूक प्रक्रियेचे वेगवेगळे स्तर आहेत. परंतु मुख्यत: संविधानात पूर्ण देशासाठी एक लोकसभा आणि वेगवेगळ्या राज्यांकरिता वेगळ्या विधानसभांचे प्रावधान आहे.

लोकसभेच्या एकूण ५४३ सीटांपैकी विभिन्न राज्यातील वेगवेगळ्या संख्येमध्ये प्रतिनिधी निवडले जातात. तसेच वेगवेगळ्या राज्यांच्या विधानसभांसाठीही वेगवेगळ्या संख्येमध्ये आमदार निवडले जातात. नगरीय निकाय निवडणुकांचे प्रबंध राज्य निर्वाचन आयोग करते. तर लोकसभा व विधानसभा निवडणुका भारत निर्वाचन आयोगाच्या नियंत्रणात होतात. ज्यात वयस्क मताधिकार प्राप्त मतदाता प्रत्यक्ष मतदानाद्वारे सांसद आणि आमदार निवडतात. लोकसभा आणि विधानसभा या दोन्हींचा कार्यकाल पाच वर्ष असतो. निवडणूकांसाठी सर्वात पहिले निर्वाचन आयोग अधिसूचना जारी करते. अधिसूचना जारी झाल्यावर संपूर्ण निर्वाचन प्रक्रियेचे तीन भाग- नामांकन, निर्वाचन आणि मतगणना असे होतात. निर्वाचनाची अधिसूचना जारी होताच नामांकन पत्र दाखल करण्यासाठी सात दिवसांचा वेळ मिळतो. त्यानंतर एक दिवसाचा कालावधी हा त्यांच्या छाननीसाठी ठेवला जातो. यात अन्य अनेक कारणांनी नामांकन पत्र रद्द पण करतात. तत्पश्चात दोन दिवस नाव परत घेण्यासाठी दिले जातात. ज्याना निवडणूक लढवायची इच्छा नाही ते आवश्यक विचार विनिमयानंतर आपले नामांकन पत्र परत घेऊ शकतात. सन १९९३च्या विधानसभा आणि सन १९९६च्या लोकसभा निवडणुकांमध्ये विशिष्ट कारणांमुळे चार-चार दिवसांची मुदत दिली गेली. तथापि सामान्यत: हे कार्य दोन दिवसात संपन्न करण्याचा प्रयत्न केला जातो. कधीकधी एखाद्या क्षेत्रात पुन्हा मतदानाची स्थिती निर्माण झाली. तर त्यासाठी वेगळा दिवस ठरवला जातो. मतदानासाठी निश्चित करण्यात आलेल्या मतदान केंद्रांवर मतदानाची वेळ सामान्यत सकाळी ७ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत ठेवली जाते.

इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीन आल्यावर मतगणनेसाठी सामान्यत: एक दिवसाचा कालावधी ठेवला जातो. मतगणना सातत्याने चालू असते त्यासाठी विशिष्ट मतगणना केंद्र निश्चित करण्यात येते. या मतदान केंद्रांवर अनाधिकृत व्यक्तिंचा प्रवेश वर्जित असतो. सगळे प्रत्याशी, त्यांचे प्रतिनिधि आणि पत्रकार इत्यादींसाठी निर्वाचन अधिकाऱ्यांद्वारे प्रवेश पत्र दिले जातात. वर्तमान काळात निर्वाचन क्षेत्रानुसार मतगणना केली जाते आणि त्यासाठी तेथील सर्व मतदान केंद्रांवर मतांची गणना करून परिणाम घोषित केला जातो. परिणामानुसार ज्या पक्षाला बहुमत प्राप्त झाले, तो पक्ष केंद्रात किंवा राज्यात आपले सरकार स्थापन करतो. भारतात मतदान करणे हे कायद्यानुसार अनिवार्य नाही. हा नागरिकांचा अधिकार आहे, कर्तव्य नव्हे.

राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि राज्यसभा सदस्य यांच्या निवडणूका प्रत्यक्ष न होता अप्रत्यक्ष स्वरूपात होतात. त्यांना जनतेने निवडून दिलेले जनप्रतिनिधीच निवडतात. निवडणूकांदरम्यान संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा निवडणूक आयोगाच्या नियंत्रणात कार्य करते. निवडणूकांची घोषणा झाल्यावर आचारसंहिता लागू होते आणि तिचे प्रत्येक राजकीय पक्ष, त्यांचे कार्यकर्ते आणि उमेदवार यांना पालन करावे लागते. आधुनिक प्रतिनिधी हे लोकशाही पद्धतीने निवडण्यासाठी एक साधन म्हणून निवडणुकीचा सार्वत्रिक वापर होतो. ईश्वर चिठ्ठीद्वारे सदस्यांची निवड करणे, हे तितकेसे विश्वसनीय वाटत नव्हते. म्हणून लोकशाहीच्या सार्वत्रिक निवडणुका या गुप्त मतदान पद्धतीने घेण्याचा निर्णय झाला. त्या काळात ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट अर्थातच नव्हते. सन १९५१-५२मध्ये बॅलेट पेपर- मतपत्रिकेचा वापर करण्यात आला होता. मतपत्रिका ही मतपेटीत टाकण्यासाठी प्रत्येक मतदान केंद्रांवर वेगवेगळ्या मतपेट्या ठेवण्यात आल्या होत्या. कोणत्याही मतपेटीत आपलं मत टाकण्याचं स्वातंत्र्य मतदाराला देण्यात आलं होतं.

सांप्रतकाळी उमेदवार हा गर्भश्रीमंत असावा लागतो. कारण त्याला निवडणुकीस सारे घरदार विकावे लागते. का? तर प्रत्येक मत त्याला विकत घ्यावा लागतो. एकेका मताला तीनशे ते पाचशे रुपये मोजावे लागतात. जनता सुशिक्षित झाली, मात्र मतदार अधिक हावरा व आमिषाला बळी पडणारा झाला आहे. त्याला विकास करणारा नेता नको तर देश उजाडणारा हवा आहे. गुप्त मतदान पद्धती ही नावालाच राहिली आहे. आज आपले मत स्वमत न राहिल्यामुळे ते मत दान न होता मत क्रय-विक्रय सर्रास होताना दिसत आहे. दांडगाई करणाऱ्या उमेदवाराचे खुपच फावत आहे. याला आळा सुशिक्षित- सुजाण नागरिक नाही तर आणखी कोण घालणार? म्हणून आजच्या मतदारास लोकशाही नको तर हुकूमशाही अर्थात पारतंत्र्यच हवे आहे. पैसाआडका, लुगडे, धोतर, कापडचोपड, दारु व पार्टी घेतलेले मतदार विश्वासघात करत नाहीत, असा उमेदवारांचा ठाम विश्वास असतो. म्हणून ते खुप उधळपट्टी करतात. मात्र फुकटात विकासपुरुषास निवडून आणण्यासाठी मतदाराचे वाकडे पाऊल पडत नाही. काही सुजाण मतदार मात्र पैसे पेरणाऱ्यांकडून खुशाल फायदा उठवितात आणि जनकल्याण करणार्या निष्ठावान उमेदवारास आपले अमूल्य मत दान करून मतदानाचा हक्क बजावतात. पैसे पेरून देशाला खाईत लोटणाऱ्या देशद्रोही- बेगडी नेताजीस अशीच धूळ चारली पाहिजे, तरच आजचा सुशिक्षित तरुण भारताचा सुजाण नागरिक म्हणता येऊ शकेल. सन २०१९मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत पुन्हा बॅलेट पेपरचा वापर करण्यात यावा, अशी मागणी विरोधक व मतदारांकडून केली गेली. ईव्हीएममध्ये घोळ असल्याची विरोधकांकडून होणारी टीका आणि ईव्हीएमचा होणारा घोळ यामुळे पुन्हा एकदा यंदाही व्हीव्हीपॅट आणि बॅलेट पेपरवर मतदान घेण्याची मागणी विरोधकांसह जागृत मतदार करत आहेत. मात्र पाषाण हृदयी निवडणूक आयोग ती मागणी धुडकावूनच लावत आहे, हे विशेष!

आज तंत्रज्ञानाच्या युगात सर्वकाही ऑनलाइन केले जात आहे. जसे की ऑनलाइन शॉपिंग, ऑनलाइन मार्केटिंग, ऑनलाइन मागणी, ऑनलाइन देवदर्शन, ऑनलाइन शिक्षण, ऑनलाइन अर्ज, ऑनलाइन परीक्षा आदींप्रमाणे ऑनलाइन मतदान सुद्धा होणे काळाची गरज आहे. त्यामुळे सर्वच निवडणूक घोटाळ्यांना टाळे लागेल, असाही एक मतप्रवाह दिसून येत आहे, तेही योग्यच म्हणा!

*************

**श्री.एन. के.कुमार जी. (से.नि. प्राथ.शिक्षक)**
**(भारताच्या वैभवशाली इतिहासाचे गाढे अभ्यासक व विश्लेषक.)**
**मु. पो. ता जि. गडचिरोली, पिन-४४२६०५.**
**फक्त व्हॉट्सप. ९४२३७१४८८३.**

# उठा ओबीसीनों जागे व्हा,परिवर्तनाचे धागे व्हा.

राज्यातील जनता सर्वच ठिकाणी,खेड्यात,शहरात गुण्यागोविंदाने नांदते मराठा समाज आणि इतर समाज एकमेकांना पुरक असतात प्रत्येक ठिकाणी एकत्र नांदतात आणि एकमेकांना सहकार्य करतात.मी ओबीसी प्रवर्गातील असुनही मला कधीही भेदभाव दिसला नाही.मराठा समाजाला आरक्षण मिळावे याला ओबीसींचा विरोध असण्याचे कारण नाही.सरकारने मराठा समाजाला वेगळं आरक्षण द्यावे ओबीसींच्या आरक्षण कोट्यातील देऊन ओबीसींना वाऱ्यावर सोडू नये ओबीसींवर अन्याय होणार नाही यावर सरकारने विचार करावा सरकार जनतेचे मायबाप असते असं आपण बोलतो सरकार कोणत्याही एका जातीसाठी किंवा कोणत्याही एका समूहासाठी काम करीत नसते तर सर्वांना समान हक्क अधिकार मिळाले पाहिजे यासाठी सरकार कटिबद्ध असते. सरकार कोणत्याही एका विशिष्ट समूहावर अन्याय होऊ देत नाही.हिच भावना राज्यातील सर्वसामान्य जनतेची असते.

लेखन कला अवगत असलेल्या ओबीसी समाजातील बुध्दीजीवी शिक्षक प्राध्यापक बंधू भगिनीनी समाजाला दिशा दाखवण्याचा संकल्प करावा.आपल्या चिकित्सक पध्दतीने सत्य असत्यातील भेद ओळखून आपल्याकडे असलेल्या लिहिण्याच्या,मांडण्याचा,व्यक्त होण्याच्या कौशल्य व सामर्थ्यातु समाजाला योग्य दिशा देण्याचे कार्य आपण करावे.या भावनेतून मी लिहत असतो.मी काही थोर विचारवंत नाही एक कष्टकरी मोलमजुरी करून जगणारा कार्यकर्ता आहे.म्हणूनच सांगतो उठा ओबीसीनों जागे व्हा,परिवर्तनाचे धागे व्हा.

सध्या मराठा आरक्षणामुळे ओबीसी समाजातील उच्च शिक्षित,सुशिक्षित बुद्धिजीवी विचारवंत लोकांना काम धंदा घरदार सांभाळून बाकी मिळालेल्या वेळातुन काही वेळ राखुन पे बॅक टु सोसायटी च्या भावनेतुन समाजाला बहुजन महापुरुषांच्या विचार व कार्याकडे घेऊन जाण्यासाठी आपण लेखन करावे विचार मांडावे व यातुन एक नवी दिशा व मार्ग दाखवण्याचं कार्य आपल्या हातून झाले पाहिजे असे ज्ञान समाजाला देण्यासाठी वेळ काढावा असे मला वाटते.यासाठी समाजातील वर्तमान भंप्पक, दांभिकता,धर्मांधता ,जातीयता,अंधश्रद्धा कर्मकांड चुकीचा चंगळवाद याच्यावरती संवैधानिक पध्दतीने घावघालून आपल्या महापुरुषांनी दाखवलेले विचार व मार्ग त्यांची निश्चित उद्देशपुर्ती याबद्दल लेखन करावे व यातुन समाज जनजागृतीत आपले योगदान नोंदणी कृत राहील असे काम करावे.बोला,वाचा उठा ओबीसीनों जागे व्हा,परिवर्तनाचे धागे व्हा.

देवधर्माच्या दिंडीत ओबीसी प्रवर्गातील लोकांची सर्वात जास्त गर्दी असते.माफ करा मला डोळ्याने जे दिसते ते लिहतो.शैक्षणिक आणि सहकार क्षेत्रात सर्वात जास्त वर्चस्व तसेच राजकीय क्षेत्रातील मक्तेदारी सर्वात जास्त मराठा वतनदार लोकांची आहे.महाराष्ट्र राज्यातील विधानसभा सभागृहात आजपर्यंत सर्वात जास्त मुख्यमंत्री पदाचा लाभ मराठा आमदारांना मिळाला आहे कि,ओबीसी,बाराबलुतेदार मागासवर्गीय घटकांना मिळाला याची माहिती घ्या सत्यता समोर येईल.म्हणुन म्हणतो उठा ओबीसीनों जागे



व्हा,परिवर्तनाचे धागे व्हा.महात्मा फुले,राजर्षी शाहू महाराज,कर्मवीर भाऊराव पाटील,पंजाबराव देशमुख आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बहुजन समाजाला शिक्षण मिळावे यासाठी शिक्षण संस्था काढल्या होत्या.त्या आजच्या मराठा सम्राटांच्या हातातील किती शिक्षण संस्था आहेत म्हणूनच लिहतो उठा ओबीसीनों जागे व्हा,परिवर्तनाचे धागे व्हा.आता आजचे चित्र काय आहे हे सर्वांना माहिती असेलच.यात माझी काही चूक भूल असू शकते.मग मला सांगा एवढं सर्व मराठा समाजाच्या हातात असून देखील ओबीसी समाजातून आरक्षण का मागतात?. आणि विशेष कोणाला मागतात?. इतिहास वाचला तर इतिहास घडविता येतो म्हणून उठा ओबीसीनों जागे व्हा,परिवर्तनाचे धागे व्हा.

ओबीसी बाराबलुतेदार हा समुह हा आपला पारंपरिक व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह चालवतो.आता तुम्हीच सांगा राव ओबीसी समाजाची अवस्था काय असेल.मराठा सम्राटांच्या सर्व संस्थांमध्ये ओबीसी समाजाची मुले काम करत असताना एक प्रकारची गुलामगिरी सहन करत नाहीत काय?.सर्वच ठिकाणी धन दांडगे राजकीय वर्चस्व असलेले बसलेले असतांना मराठा समाजाच्या तरुणा वर अन्याय कोण करते?. गावा पासून शहरा पर्यंत कोणाचे वर्चस्व आहे. ओबीसी समाजाच्या तरुणांना आपल्या नोकऱ्या टिकवण्यासाठी काय काय करावे लागते. सर्व ठिकाणी त्यांच्या मर्जीप्रमाणे वागावे लागत आहे. त्या शिवाय जगता येणार नाही.आणि बहुसंख्य ओबीसींनी हीच मानसिकता बनून ठेवली आहे. तो बंड करून उभा राहू शकत नाही. म्हणूनच मी खेड्यातील येडा लिहतो उठा ओबीसीनों जागे व्हा,परिवर्तनाचे धागे व्हा.

********

**प्रमोद सूर्यवंशी**
**८६०५५६९५२१,**
**चिखली मातृतीर्थ बुलढाणा.**

# ६ फेब्रुवारी लता मंगेशकर पुण्यतिथी

स्वर्गीय लता मंगेशकर यांनी गाण्याच्या ताकदीवर संपूर्ण विश्वाला जिंकले व भारताची मान उंचावली.त्याचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ लाल इंदोर मध्यप्रदेश येथे झाला.वयाच्या ५ व्या वर्षांपासून गाणे गाण्याला सुरूवात केली व १३ व्या वर्षी लता दीदीने पहिले गाणे गाइले होते. दु:खाची बातमी म्हणजे लतादीदींच्या वयाच्या १३ व्या वर्षी वडिलांचे निधन झाले या संपूर्ण दु:खात राहुन त्यांनी मागे वळून कधीच पाहिले नाही व गाणं सम्राज्ञी बनली आणि त्यांच्या गाण्याने विश्वाचे संपूर्ण रेकॉर्ड तोडले.लता दीदीने आपल्या कारकीर्दीत तब्बल ३० हजार गाणे गायलेत तेही ३६ वेगवेगळ्या भाषांमध्ये.त्यांनी आपल्या गाण्याच्या माध्यमातून जनजागृती, समाजहित, मनोरंजनात्मक,संस्कृतीक,देशहित,भावनीक, देशभक्ती, धार्मिक अशा अनेक मिश्रणाने ३० हजार गाणे गायले व पार्श्वगायिका, संगीत निदेशक,निर्माताची मोठी भूमिका बजावली त्यामुळेच त्यांना आपण स्वर कोकिळा व गाणं सम्राज्ञी म्हणतो.१९६२ मध्ये चीन सोबत युद्ध संपल्यानंतर काही दिवसांतच २६ जानेवारी आली.२६ जानेवारी १९६३ ला हे मेरे वतन के लोगो या गाण्याने संपूर्ण भारतीयांच्या डोळ्यात अश्रू आले व संपूर्ण भारत देशाला एकसुत्रीत ठेवण्यासाठी मोलाची भूमिका लता दीदीने बजावली. यावरून आपण समजू शकतो की त्यांच्या गाण्यात व आवाजात मोठी ताकद व दैवी शक्ती होती. त्याचप्रमाणे त्या साक्षात सरस्वतीचे रूप सुध्दा होत्या.परंतु ६ फेब्रुवारी २०२२ ला ९२ व्या वर्षी त्यांचे निधन झाले.हा दिवस फिल्म जगत,कला, साहित्य,संगीतजगत व सर्वांसाठी दु:खद ठरला व जनुकाय संगीत विश्वाचा अंत झाला की काय असे वाटायला लागले.लता दिदी कुटुंबात मोठी होती व संपूर्ण जीवन संघर्षमय रहाले.परंतु त्यांच्या गाण्याने संपूर्ण विश्व जिंकून गाणं सम्राज्ञी झाली. संघर्षमय जिवनात संगीताच्या फुलांनी नेहमीच त्यांचे स्वागत केले.आपण गाण्यातील चमकता तारा गमविला आहे.जोपर्यंत सुर्य-चंद्र, आकाश-पाताळ आहे तोपर्यंत त्यांचे नाव अमर राहील. आवाजाचे दुसरे नावच लता दीदी आहे.लता दीदींच्या गाण्यानेच फिल्म जगत शिखरावर पोहोचले.लता दीदींची संगीताची व गाण्याची प्रेरणा अनेक युगापर्यंत जीवीत राहिल. आज त्यांच्या पुण्यतिथी निमित्त संपूर्ण जग त्याचे स्मरण करीत आहे.लता दिदीला पुण्यतिथी निमित्त कोटी कोटी प्रणाम.जय हिंद.

***************

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर) मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर**

# शिस्त, संस्कार आणि ज्ञानाची शिकवण देणारा गुरू हरपला माखजन इंग्लिश स्कूलचे माजी मुख्याध्यापक एस.वाय. रानडे यांचे दुःखद निधन

संगमेश्वर : येथील माखजन इंग्लिश स्कूलचे माजी मुख्याध्यापक एस.वाय. रानडे यांचे दुःखद निधन झाले. अत्यंत शिस्तप्रिय, इंग्रजी विषयाचे गाढे अभ्यासक म्हणून ते प्रसिध्द होते.

माखजन इंग्लिश स्कूलचे माजी मुख्याध्यापक एस.वाय. रानडे यांचे रत्नागिरी येथे बुधवारी रात्री ९ वा.३१ फेब्रुवारी रोजी दुःखद निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ८५ वर्षे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली आणि नातवंडं असा परिवार आहे.

अत्यंत शिस्तप्रिय, इंग्रजी विषयाचे गाढे अभ्यासक, शेकडो विद्यार्थ्यांचा इंग्रजी विषयाचा पाया मजबूत केलेले, विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत महत्वाची भूमिका बजावणारे एस.वाय. रानडे यांच्या निधनामुळे त्यांच्या विद्यार्थी वर्गात मोठी शोककळा पसरली आहे. आज मोठमोठ्या पदावर काम करणाऱ्या विद्यार्थांना घडविणारे रानडे गुरूजींचा इंग्रजी हा आवडता विषय आणि गणित विषयात निपुण होते. आपल्या विद्यार्थ्यांना ज्ञानदान देण्यासोबत त्यांनी



शिस्तीचे आणि संस्काराचे देखील धडे दिले. रानडे गुरूजींनी दिलेली शिकवण, प्रसंगी विद्यार्थ्यांना चांगले वळण आणि चांगले संस्कार देताना दिलेल्या छडीची आठवण आजही अनेक विद्यार्थी विसरलेले नाहीत. आपल्या हातून एक चांगली पिढी घडली तर ती पुढची चांगली पिढी घडवत असते यावर रानडे गुरूजींचा विश्वास आणि भर होता. त्यामुळे त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात अगदी शाळेत शिकवताना आणि निवृत्ती नंतर देखील विद्यार्थ्यांना उत्तम मार्गदर्शन करण्याचे काम केले. रानडे गुरूजी विद्यार्थ्यांना शिस्त लावण्यासाठी जितके कडक वागले तितक्याच प्रेमाने त्यांनी विद्यार्थांचे लाड देखील केले. त्यामुळे गुरुजींच्या जाण्याने त्यांचा विद्यार्थी वर्ग हळहळ व्यक्त करत आहे आणि हे देवा, आमचा देव तुझ्याकडे येत आहे त्यांच्या पवित्र आत्म्यास शांती दे अशी ईश्वराला भावनिक साद घालत आहे.

# आम्ही घाटकोपर प्रतिष्ठानच्या वतीने नशा मुक्ती चषक.




मुंबई :- मुंबई घाटकोपर येथील महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचे केंद्रबिंदू माता रमाबाई आंबेडकर नगर मध्ये आम्ही घाटकोपर प्रतिष्ठान आयोजित भव्य अंडर आर्म बॉक्स क्रिकेट स्पर्धा नशा मुक्ती चषक ठेवण्यात आले असून वंचित बहुजन माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियनचे सुरेशजी मोहिते साहेब (महाराष्ट्र सरचिटणीस) यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करून क्रिकेट स्पर्धा सुरू करण्यात आले व महाराष्ट्रातील युवा आयकॉन आदरणीय सुजात दादा आंबेडकर यांच्या उपस्थितीमध्ये जनसंवाद यात्रा मध्ये माता रमाई आंबेडकर नगर मध्ये नशा मुक्त व्हावा यासाठी जनतेला आव्हान केले असून अविनाश कदम यांनी घाटकोपर प्रतिष्ठानच्या माध्यमातून नशा मुक्ती चषक ठेवण्यात आले व उद्घाटक वंचित बहुजन माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियनचे सुरेशजी मोहिते साहेब (महाराष्ट्र सरचिटणीस) यांच्या हस्ते करण्यात आले व अविनाश कदम यांना पुढच्या भावी समाजसेवा साठी शुभेच्छा देण्यासाठी वंचित बहुजन माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियनचे, प्रदीप गौतम साळवे (नवी मुंबई निरीक्षक), विनोद नरवाडे (महाराष्ट्र ख.ढ प्रमुख), सचिन केदारे (घाटकोपर तालुका महासचिव), व दीपक भोसले (समाजसेवक), यांनी शुभेच्छा देण्यात आल्या व उपस्थितीमध्ये कार्यक्रम पार पाडण्यात आला.

# परत एक भू-माफिया,सराईत गुन्हेगार लातूर जिल्ह्यातून हद्दपार. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांची कारवाई

लातूर :- परत एक भू-माफिया,सराईत गुन्हेगार लातूर जिल्ह्यातून हद्दपार. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांची कारवाई* याबाबत याबाबत थोडक्यात माहिती अशी की, पोलीस ठाणे लातूर ग्रामीण तसेच लातूर शहरातील विविध पोलिस ठाण्याच्या हद्दीत वारंवार गंभीर स्वरूपाचे गुन्हे करणाऱ्या व जमिनीवर बेकायदेशीर कब्जा करून जमिनी बळकाविण्याचा प्रयत्न करणाऱ्या भूमाफिया,सराईत गुन्हेगारांविरुद्ध हद्दपारीची (तडीपार) कारवाई करण्यात आली असून हद्दपारची कारवाई करण्यात आलेल्या इसमाचे नाव गोपाळ गोविंद लकडे, वय ४३ वर्ष, राहणार बोरवटी, तालुका जिल्हा लातूर. असे आहे.

त्यांच्यावर सन २०१९ ते २०२३ कालावधीमध्ये मारामारी , दुखापत करणे, गैर कायद्याचे मंडळी जमून मारामारी करणे, महिलांचे विनयभंग करणे, जीवे मारण्याची धमकी देणे, घरात घुसून मारहाण करणे, एकाच जागेची परत-परत विक्री करून फसवणूक करणे, तोतयागिरी करून ठकवणूक करणे, बनावट शासकीय दस्तऐवज तयार करणे यासारखे गंभीर गुन्हे दाखल असून त्याच्यामुळे सामाजिक शांतता धोक्यात आली होती.

आगामी सण उत्सवाच्या व निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्ह्यात शांतता अबाधित राहावी, तसेच भूमाफियांच्या अवैध कृतीला प्रतिबंध करण्यासाठी, नमूद सराईत गुन्हेगार याचे कडून कोणत्याही प्रकारचे गैरकायदेशीर कृत्य घडू नये, याकरिता लातूर ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत वारंवार मालमत्ता विषयी व शरीराविषयी गंभीर स्वरूपाचे गुन्हे करून नागरिकांमध्ये दहशत निर्माण करून नागरिकांची व शासनाची फसवणूक करणाऱ्या गुन्हेगाराला एक वर्षासाठी हद्दपार (तडीपार) करण्यात आले आहे.

यासंदर्भात पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांनी लातूर ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दीपककुमार वाघमारे यांना सदर सराईत आरोपी विरुद्ध उपविभागीय दंडाधिकारी, लातूर रोहिणी न-हे-विरोळे यांच्याकडे पाठविण्यात आलेल्या हद्दपारिच्या प्रस्तावाचा पाठपुरावा करण्यासंदर्भात आदेशित केले होते. त्यावरून अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी (लातूर ग्रामीण) सुनील गोसावी यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले व पोलीस ठाणे लातूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक दीपककुमार वाघमारे, तत्कालीन पोलीस निरीक्षक गणेश कदम व त्यांच्या टीम मधील पोलीस उपनिरीक्षक तानाजी पाटील पोलिस अमलदार प्रदीप स्वामी, राहुल दरोडे, सचिन चंद्रपाटले, सतीश लामतुरे यांनी नमूद सराईत आरोपी विरुद्ध सविस्तर हद्दपारचा प्रस्तावाचा पाठपुरावा करून उपविभागीय दंडाधिकारी लातूर यांचे कार्यालयात सुनावणीअंति नमूद आरोपीस मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६(१)अन्वये एक वर्षासाठी लातूर जिल्ह्यातून हद्दपार (तडीपार) करण्यात आले आहे.

आगामी काळात साजरे होणारे सण-उत्सव व येणारे काळात होऊ घातलेल्या निवडणुकांचे अनुषंगाने त्यांचे विरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ (१) प्रमाणे कार्यवाही करून सदर सराईत गुन्हेगाराला लातूर, जिल्ह्यातून तसेच कळंब,अंबाजोगाई, उस्मानाबाद तालुक्यातून एक वर्षासाठी हद्दपार करण्यात आले आहे.

सदर कारवाईच्या माध्यमातून गुन्हेगारी कृत्य करणाऱ्या, शासनाची व नागरिकांची फसवणूक करून जमिनी बळकावणाऱ्या भूमाफिया व सराईत, उपद्रवी गुन्हेगाराला जिल्ह्यातून हद्दपार केल्यामुळे इतर गुन्हेगारीकृत्य करणाऱ्यां गुन्हेगारांना,भू-माफियाना चांगलाच दणका बसला आहे.

# शासन आपल्या दारी अभियानास कुकशेत गांवातील जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद








नवी मुंबई / के. एच. हनवते :- महाराष्ट्र राज्य सरकारच्या माध्यमातुन प्रत्येक जिल्ह्यामधे एकाच दीवशी विवीध सरकारी योजनांचा जिल्हातील लाभार्थ्यांना थेट लाभ उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच शासकीय योजना लोकाभिमुख करुन त्यांची अमलबजावणी गतीमान करण्यासाठी शासन आपल्या दारी हे अभियान राबविण्याचे शासनाने ठरविले आहे त्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेच्या विवीध विभागा मार्फत राबविण्यात आलेल्या विवीध कल्याणकारी योजनांचे स्टॉल तसेच जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत शासनाच्या विवीध कल्याणकारी योजनां सदर स्टॉलवर उपलब्ध करून दिले. अर्ज, माहीती पत्रके, तसेच स्टॉलवर नागरीकांकडुन विवीध नमुन्यातील अर्ज भरुन घेतले. सदर ठिकाणी काही योजनांचा तात्काल लाभ नागरिकांना देण्यात अला. सदर कार्यक्रम नमुंमपा शाळा क्रमांक ११, कुकशेत गाव, सेक्टर १४, नेरुळ, नवी मुंबई येथे दिनांक : ५ फेब्रुवारी २०२४, रोजी सकाळी ११ ते दुपारी १ पर्यंत. सर्व नागरीकांनी या उपक्रमात उपस्थित राहुन योजनांचा माहीती व लाभ घ्येतला. सदर कार्यक्रम प्रसंगी नेरूळ बी विभाग राजेंद्र इंगळे सह नमुंमपा अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमासाठी आपला माजी नगरसेवक सुरज बाळाराम पाटील व सहकारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

# बुलिंगमुळे मानसिक खच्चीकरण कसं होतं?


हल्ली प्रदर्शित झालेला पंकज त्रिपाठी आणि अक्षय कुमारची प्रमुख भूमिका असलेला चित्रपट 'ओ माय गॉड' आपल्यापैकी बऱ्याच लोकांनी पाहिला असेल. त्यातल्या शाळकरी मुलाला (विवेक) जो सगळ्या बाबतीत चांगला , चांगल्या कुटुंबातला , नृत्यात प्रवीण असलेला आपण पाहातो. बरोबरची मुलं त्याच्या सालसा डान्स मध्ये पार्टनर असणाऱ्या मुलीवरुन नाराज असतात. त्या मुलीच्या शाळकरी बॉयफ्रेंडला तिचं त्याच्याबरोबर डान्स करणं आवडत नाही आणि शिक्षकांना सांगून ती पार्टनर बदलते.मग असे का झाले असेल असा प्रश्न जेव्हा विवेकला पडतो , तेव्हा त्याचे मित्र त्याला चिडवतात आणि सांगतात की याचं कारण तुझ्या जननेंद्रियाची साईज कमी आहे असं आहे. अश्लील हातवारे करून यावर चर्चा करून त्याला छळतात. त्यातच विवेक विचारात पडतो आणि आपल्या जननेंद्रीयाची साईज कमी असल्याचा त्यालाही वाटू लागतं. शिक्षकांना विचारू पाहातो तर ते रागावून त्याला निर्लज्ज म्हणून गप्प करतात. मग यावर उपाय म्हणून तो अनेक फसव्यांना बळी पडतो , उदास होतो आणि इतका स्वतः ला हरवतो की स्वतः बद्दल कमीपणा वाटून आयुष्य संपवायचा निर्णय घेतो. या प्रकाराला बुलिंग करणे असे म्हणतात.बुलिंगच्या घटना सगळीकडे होतांना आपण पाहतो. मुलांचं बुलिंग म्हणजे एखाद्याला दरडावणे , चिडवणे , घाबरवणे , अश्लील शब्द वापरून अश्लील हावभाव करणे , शिव्या देणे होय. या सर्व गोष्टींचे खापर आपण मोबाईल वर फोडून मोकळे होतो. मोबाईलमुळे मुलं जास्तच बिघडत चालली असे आरोप सहज करतो आणि मुख्य मुद्दा बाजूलाच राहून जातो. सारख्या अशा घटनांमुळे मुलांचा आत्मविश्वास ढासळतो , आपण असंच डिझर्व्ह करतो अशी त्यांची भावना निर्माण होते, आत्मविश्वास ढासळतो आणि मग सुरू होतो बुलिंग ते ट्रॉमाचा प्रवास ! हे सगळे भीतीदायक आणि धक्कादायक आहे. पण पालकांचा बुरा ना मानो होली है ! चा दृष्टिकोण अशावेळी घातक ठरतो.परवाच एका हळदीकुंकूच्या कार्यक्रमात एक पालक अतिशय कौतुकाने सांगत होते की आमचा बंटी एका मुलीला आंटी बोलला तर तिच्या आईचा फोनच आला . मी म्हटलं , तिला पण सांगा त्याला अंकल म्हणायला ! आपला मुलगा चुकीचं वागतो आहे याची जाणीवदेखील त्यांना नव्हती. अशातच एवढं तेवढं तर चालूच असतं ! थोड चिडवलेलं पण तुला सहन होत नाही ! मुलगा असूनही मुलींसारखे वागतोस ! काय काकूबाईसारखी वागते ? तूच काहीतरी केलं असशील ! लक्ष देऊ नको ! असे सल्ले आपण देतो.मुलांना घराबाहेर अनेक स्वभाव , शरीरप्रकृती , गुंडप्रवृत्तीचा सामना करावा लागतो. तेव्हा मुलं काही बोलत असतील तर त्या गोष्टीकडे टाळाटाळ न करता किंवा उलटा समज न देता त्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. बुलिंग सारख्या परिस्थितीत बघे पालक न होता पीडितांच्या पालकांना साथ द्यायला हवी. योग्य नियमावली ठरवून गुन्हेगाराला ऐकून घेऊन




तो किंवा ती असे का वागले याची पडताळणी शिक्षक आणि समुपदेशकांनी करावी. गुन्हेगार नकारात्मक गोष्टींचा सामना करत असेल आणि त्याचा परिणाम म्हणून असे वागत असेल तर त्याला पालकांसमवेत समुपदेशक किंवा मानसोपचार तज्ज्ञांकडे मार्गदर्शनासाठी पाठवावे.बुलिंगला बळी पडलेली मुलं आत्मविश्वास घालवून बसतात. त्यांना उदासीनता, भीती वाटणे, शाळेतील परफॉर्मन्स आणि टक्केवारी खालावणे अशा अनेक गोष्टी सतावू शकतात. तेव्हा समजावून ही लक्षणे कमी होत नसल्यास कॉग्निटिव बिहेवियरल थेरेपीच्या माध्यमातून त्यांची मदत करता येते. मानसोपचार तज्ज्ञांची भूमिका यात महत्वाची असते.बुलिंगची समस्या कायद्याला आव्हान देणारी असेल उदाहरणार्थ एखाद्याचा लैंगिक छळ यातून झाला किंवा तीव्र शारीरिक , वित्तीय किंवा मानसिक इजा कोणाला झाली तर जुवेनाइल जस्टिस एक्ट च्या अन्वये त्याचे बळी पडलेल्या मुलांना केअर आणि प्रोटेक्शन मिळते आणि गुन्हेगार ( चिल्ड्रेन इन कॉन्फ़्लिक्ट विथ लॉ ) मुलांना आब्जर्वेशन होम मधे ठेवून त्यांचे समुपदेशन केले जाते . शाळेची अब्रू वाचवण्यासाठी शिक्षकांनी अशी प्रकरणे दाबू नये . शिवाय पालकांनी ही याबाबत जागरूक राहाणे महत्वाचे आहे . मूल्यशिक्षणात वाचन , लेखन , गणन याचा समावेश असावा . ध्यान , प्राणायाम , सूर्यनमस्कार शालेय जीवनात समाविष्ट करणे महत्वाचे आहे . मुलांमध्ये आणि पालकांमध्ये बुलिंग बद्दल जागरूकता निर्माण करणेही आवश्यक आहे .

# रील्स करतंय रिअल आयुष्य खराब

सर्व सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सची रचना वापरकर्त्यांनी पुन्हा पुन्हा त्या प्लॅटफॉर्म्सवर यावी अशी केलेली आहे कारण तो एक व्यवसाय आहे. कुठलाही व्यवसाय चालायचा असेल तर ग्राहकाने फक्त एकदा येऊन भागत नाही तर परत परत यावं लागतं. दारुच्या दुकानांत, पान टपरीवर लोक पुन्हा पुन्हा जातात कारण तिथे मिळणाऱ्या गोष्टींच्या सेवनाची त्यांना सवय लागलेली असते. सुरुवातीला अवलंबत्व आणि मग व्यसन लागेलेलं असतं. तोच काहीसा प्रकार सोशल मीडियाच्या संदर्भात होतोय असं जगभरातल्या अनेक संशोधनातून पुढे येतंय. तिथे निर्माण होणारी ओळख, मिळणारं कौतुक, फॉलोअर्स याची मनाला, मेंदूला सवय लागली की त्यातून अवलंबत्व आणि पुढे जाऊन व्यसन लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. पण हे झालं जे पोस्ट्स करतात त्यांच्या संदर्भात. पण इंटरनेटच्या आणि सोशल मीडियाच्या जगात असाही प्रचंड मोठा समुदाय आहे जो तिथे खूप ॲक्टिव्ह नसतो. तो तिथे लव्ह, लाईक, व्ह्यूज, कौतुक यासाठी येत नाही तरीही त्याला सतत, पुन्हा पुन्हा इंटरनेटवर, सोशल मीडियावर यावंसं वाटतं. तो तिथे अडकून पडतो आणि हळूहळू व्यसनी होतो किंवा तशी शक्यता निर्माण होते. असं विविध कारणांमुळे होतं पण इंटरनेट प्रामुख्याने असा आभास निर्माण करतं की व्यक्ती काहीतरी करते आहे, प्रत्यक्षात 'स्क्रोल' करण्याव्यतिरिक्त पॅसिव्ह वापरकर्ते काहीच करत नसतात, पण आपण काहीतरी करतोय हा आभास मात्र निर्माण होतो.आता मुलांच्या संदर्भात हे बघूया. गणितं सोडवण्याच्या सोप्या युक्त्या सांगणारे कितीतरी रील्स ऑनलाईन बघायला मिळतात. मुलं ते बघत असतात पण स्वतः गणितं सोडवण्याची वेळ आली की किती टक्के मुलं रील्स मधल्या गोष्टी लक्षात ठेवून करुन बघतात? किंवा रील्स बघत असताना एकीकडे कागदपेन घेऊन त्या युक्त्यांप्रमाणे एखाद दोन गणितं सोडवून बघतात? याचे प्रमाण कमी आहे. म्हणजे आपण गणित सोडवतोय, सोडवू शकतो, या युक्त्या वापरून आपण चटकन अभ्यास संपवणार आहोत हे विचार मनात असतात पण प्रत्यक्ष कृती घडतेच असं नाही. मुलांच्या बाबतीत हे सातत्याने होत राहिलं तर त्याचे दीर्घकालीन विपरीत परिणाम होऊ शकतात.सोशल मीडियाच्या व्यसनातून



किंवा अवलंबत्वातून जे प्रश्न मुलांच्या संदर्भात तयार होतायेत त्यातला अजून एक गंभीर प्रश्न म्हणजे त्यांना त्यांचं सगळं जग ऑनलाईन विश्व वाटतंय. ते ज्या घरात, शहरात, देशात राहतात त्याच्याशी त्यांचा कनेक्ट तुटलेला आहे असं नाही पण खऱ्या जगापेक्षा ऑनलाईन जगावर त्यांचा जास्त विश्वास आहे, जे धोकादायक असू शकतं. मुलांच्या कार्यशाळेत मुलं अनेकदा सांगतात की पूर्वी वाचन जास्त होतं आता फोनमुळे वाचनच होत नाही, हस्तकला करण्याचा कंटाळा येतो, मैदानावर खेळायला जावंसं वाटत नाही, रील्स खूप बघतो पण लक्षात राहत नाही, अभ्यास करायचा असतो पण कंटाळा येतो, एकाग्रता नाहीये.. सोशल मीडिया आणि इंटरनेटचे विविध स्तरीय परिणाम मुलांवर होतायेत.

# आमदार गणपत गायकवाड व त्यांच्या सहकाऱ्यावर ॲट्रोसिटीचा गुन्हा दाखल

उल्हासनगर / प्रतिनिधी : भाजपाचे आमदार गणपत गायकवाड यांनी हिल लाईन पोलिस ठाण्यातच गोळीबार करुन शिंदे गटाचे महेश गायकवाड यांना गंभीर जखमी केले असुन या गुंह्यात सध्या ते अटकेत आहेत. याच प्रकरणात मुळ जमीन मालक एकनाथ जाधव व त्यांच्या पत्नी मधुमती उर्फ निल एकनाथ जाधव यांना जातीवाचक शिवीगाळ केल्याने हिल लाईन पोलिस ठाण्यात ट्रोसिटीचा गुन्हा दाखल झाला असल्याने गणपत गायकवाड यांच्या अडचणी वाढल्या आहेत. या गुंह्यातील गायकवाड सोडुन सर्व आरोपी फरार झाले असुन पोलिस त्यांचा शोध घेत आहेत. या बाबत पोलिसानी दिलेल्या माहीती नुसार हिल लाईन पोलिस ठाण्याच्या अंतर्गत द्वारली गांव असुन या गावातील एकनाथ जाधव यांची सर्व्हे न . ६ अशी जमीन आहे . या जमीनीचा वाद हा न्यायप्रविष्ठ आहे. सदर जमीनीवर आमदार गणपत गायकवाड यांनी हक्क दाखवला असल्याने ते दोन दिवसा पुर्वी त्या जागेवर पत्र्याचे कंपाऊंड बांधन्यासाठी आपल्या सहकाऱ्याने घेवुन गेले होते. तेव्हा मुळ जमीन मालक एकनाथ जाधव त्यांची पत्नी मधुमती , सुनिल जाधव, ज्योस्त्ना जाधव व त्यांचे नातेवाईक हे जमीनीवर गेले असता, त्या जागेवर गणपत गायकवाड हे पत्र्याचे कंपाऊड मारत होते . याला विरोध करत जाधव परिवाराने त्यांचे काम रोखन्याचा प्रयत्न केला . दरम्यान तुम्ही येथे कंपाऊंड कसे मारता आम्ही महसुल विभाग मंत्रालय येथे अपिलात गेलो आहे.अजुन निकाल लागला नाही असे गायकवाड याला म्हटल्यावर त्याने रागात फावड्याचा दांडा घेवुन मधुमती जाधव व त्यांचे पती एकनाथ जाधव यांच्या अंगावर धावुन जावुन जोराने ओरडुन तुम्ही महारडे सुधारणार नाही. तुमच्या जमीनी आम्ही विकत घेतल्या शिवाय सोडणार नाही. तुम्ही कोणत्या ही कोर्टात जा असे बोलुन जातीवाचक शिवीगाळ केली आहे. तेव्हा हिल लाईन पोलिसानी मधुमती उर्फ निल एकनाथ जाधव यांच्या तक्रारीवरुन आमदार गणपत गायकवाड , जितेंद्र पारीक , सौरव सिंग , छोटु खान , विठ्ठल चिकनकर , शिवाजी फुलोरे , चंद्रकांत ओल , मंगेश वारघटे यांच्या विरुध्द कलम १४३, १४७, १४८, १४९ ,५०४, ५०६ अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ चे कलम ३(१) ३(१) आर ३(१) एस , या प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन यातील आरोपी गणपत गायकवाड हे सध्या ठाणे क्राईम ब्रँच च्या ताब्यात असुन त्यांना गोळीबार प्रकरणी ११ दिवसाची पोलिस कोठडी मिळाली आहे तर या गुंह्यातील बाकी आरोपी फरार झाले असुन या गुंह्याचा तपास सहायक पोलिस आयुक्त सुरेश वराडे हे करत आहेत.

# हिवाळ्यात कानदुखीचा खूप त्रास होतोय? मग करा 'हे' आठ सोपे उपाय, काही मिनिटांत मिळेल आराम

हिवाळा ऋतू अनेकांना आवडत असला तरी यादरम्यान अनेक आजारांना सामोरे जावे लागते. अनेकांना यादरम्यान कान दुखण्याच्या समस्येला सामोरे जावे लागते. थंडगार हवेत आरामदायी झोप लागत असली तरी या हवेमुळे अनेकांना कानदुखीचा त्रास होतो. हिवाळ्यात अनेकदा सर्दीमुळे कानदुखीचा त्रास सुरू होतो. अशा स्थितीत दिल्लीतील सीके बिर्ला हॉस्पिटलच्या ईएनटी विभागाच्या प्रमुख सल्लागार डॉ. दीप्ती सिन्हा यांनी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना कानदुखीपासून आराम मिळवण्यासाठी काही सोपे उपाय सांगितले आहेत. डॉ. दीप्ती सिन्हा यांनी सांगितले की, हिवाळ्यात कानदुखीमागे अनेक कारणं असू शकतात. ज्यात थंड, कोरडी हवा, आर्द्रतेतील बदल, सायनस इन्फेक्शन आणि श्वसन संक्रमणाचा उच्च धोका अशा काही कारणांचा समावेश होतो. आतड्यांमधील जमलेली घाण झपाट्याने काढून टाकतील 'हे' ७ पदार्थ? बद्धकोष्ठतेचा त्रास पुन्हा होणार नाही!कानात होणाऱ्या जळजळीमुळे अस्वस्थता वाढू लागते. यात थंड हवामान आणि वातावरणातील सततच्या बदलांमुळे कानात कोरडेपणा येतो.

# मूकनायक डॉ.बाबासाहेब आंबेडकर पत्रकार दिन सोहळा उत्साहात संपन्न.
# महामानवाच्या विचारांची चळवळ पुढचे तीनशे चौसष्ट दिवस सुरु ठेवा - भारत तांगडे





वाशिम / विशेष प्रतिनिधी :- समस्त भारतीयांसाठी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर जिवाचे रान करुन स्वातंत्र्य,समता,बंधुता या मुल्यावर आधारीत विचारांचे मोती वेचून जगात सर्वश्रेष्ठ असलेल्या संविधानाची निर्मिती केली आहे. बाबासाहेबांच्या प्रत्येक विचारात स्वाभिमानाने जगण्याचा अंगार आहे. महामानवाच्या या ज्वलंत विचारांची चळवळ वर्षातून केवळ एकच दिवस नव्हे तर पुढचे तीनशे चौसष्ट दिवस सुरु ठेवा,असे आवाहन अप्पर पोलीस अधिक्षक भारत तांगडे यांनी वाशीम येथील पत्रकारांना केले.ते दि. ३१ जानेवारी रोजी स्थानिक पाटणी व्यापारी संकुलातील चिंतामणी हॉलमध्ये मूकनायक डॉ.बाबासाहेब आंबेडकर पत्रकार दिन सोहळ्याच्या कार्यक्रमात उद्धाटक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोहळा समितीचे अध्यक्ष सुनिल कांबळे हे होते. तर प्रमुख व्याख्याते म्हणून दैनिक सकाळचे जेष्ठ माजी संपादक भूपेंद्र गणवीर,पाहूणे म्हणून जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे,समाज सेवक गोपाळराव आटोटे गुरुजी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी आरिफ शहा,जेष्ठ पत्रकार माधवराव अंभोरे,प्रदीप टाकळकर,सौ.भारती निलेश सोमाणी,इरफान सय्यद,किशोर गोमासे,संदीप पिंपळकर,बंडू इंगोले,विशेष उपस्थितीमध्ये वंचितचे विदर्भ अध्यक्ष डॉ.सिध्दार्थ देवळे, मिलींद सोनोने,अनिल ताजणे,सौ. संगीताताई इंगोले,दौलतराव हिवराळे,तेजराव वानखेडे, जि.प.सदस्या कल्पनाताई राऊत,राजीव दारोकार,मेघाताई डोंगरे, अनंतकुमार जुमडे,आशिष इंगोले यांची उपस्थिती होती.प्रारंभी अध्यक्ष, उद्घाटक व प्रमुख पाहूण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन त्यांना अभिवादन करण्यात आले. स्वागताध्यक्षा सौ.सुरेखाताई संजु वाडे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका व पत्रकार दिनाचे महत्व विशद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विनोद तायडे यांनी केले. त्यांनी आपल्या भाषणातून माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा हा अंगार बहूजनांनी आपल्या मनामनात फुलवत ठेवण्याचे आवाहन त्यांनी केले.

समाजसेवक गोपाळराव आटोटे गुरुजी यांनी पत्रकारांच्या लेखणी ह्या तलवारीसारख्या तळपल्या पाहिजे ज्यातून समाजातील अनिष्ट रूढी परंपरा याचा खात्मा केला गेला पाहिजे असे मत व्यक्त केले. तर प्रमुख व्याख्याते भूपेंद्र गणवीर यांनी उपस्थित पत्रकारांना संबोधित करताना सांगितले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मूकनायक,बहीष्कृत भारत,समता व जनता यासारखे वृत्तपत्रे काढून त्याव्दारे जनतेला त्यांच्या मुलभूत हक्क व अधिकाराची जाणीव करुन दिली. सर्व समाजासाठी उपकारक अशा संविधानाची निर्मिती करुन लोकशाहीचा पाया रचला आहे. पत्रकारीतेत त्यांचे अमूल्य योगदान आहे.त्यामुळे त्यांच्या 'मूकनायक' चळवळीला पुढे नेण्याची आज गरज आहे असे मत त्यांनी व्यक्त केले.आपल्या गहन आणि बुध्दीमत्तापूर्ण भाषणात अप्पर पोलीस अधिक्षक भारत तांगडे यांनी डॉ. बाबासाहेबांनी केलेले कार्य प्रखर शब्दात उपस्थितांसमोर मांडून त्यांच्यात चेतना जागविली. मूकनायकाचे हे कार्य केवळ एका दिवसापुरते मर्यादीत न ठेवता ही चळवळ पुढचे तीनशे चौसष्ट दिवस सुरु ठेवा असे त्यांनी सांगीतले. दरम्यान मान्यवरांच्या हस्ते सम्राट टाईम्स वृत्तपत्राच्या मूकनायक विशेषांकाचे विमोचन करण्यात आले. सदर कार्यक्रमाच्या औचित्याने जिल्हयाच्या पत्रकारीता क्षेत्रासह विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणारे अनिल कांबळे,बबनराव खिल्लारे,विश्वास वाल्हे,सुनील मिसर,सुधाकर पखाले, सुभाष तायडे, किरण पखाले,भारत कांबळे,डॉ.माधव हिवाळे,रवी अंभोरे, वसंत इंगोले,राजाभाऊ इंगोले,नानाभाऊ देवळे,विनोद डेरे,अविनाश भगत, माणिकराव डेरे,प्रवीण आडुळे,संतोष कांबळे,बळवंत भगत,रा. ना.अंभोरे,मोनाली विनोद गणवीर,दिगंबर सोनोने,राम धनगर आदी पत्रकारांचा मान्यवरांच्या शुभहस्ते स्मृतिचिन्ह.शाल,पुष्पगुच्छ व मूकनायक पुस्तक देवून सत्कार करण्यात आला. मोहन शिरसाट यांना देण्यात आलेला पुरस्कार त्यांच्या पत्नी वनिता शिरसाट यांनी स्वीकारला. तर विनोद तायडे व संदिप डोंगरे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजकुमार पडघाण व माधव डोंगरदिवे यांनी केले तर आभार पप्पू घुगे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजन समिती मार्गदर्शक बबनराव खिल्लारे, अध्यक्ष सुनील कांबळे,विनोद तायडे,अजय ढवळे,पप्पू घुगे,संदीप डोंगरे,डॉ.माधव हिवाळे,दिनेश पठाडे,राजकुमार पडघाण,महेंद्र ताजने,माधव डोंगरदिवे, किरण पडघाण यांच्यासह यशोमित्र दापुरकर,श्रेयांश घुगे आदींनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाला जिल्हाभरातील विविध वृत्तपत्राचे पत्रकार बांधव बहूसंख्येने उपस्थित होते, त्यांचा ही यावेळी सत्कार करण्यात आला.

# प्रहार चा एकच वार विरोधक गार, राजकारणी देव त्याला मतदाराच भेव..! आमदार बच्चुभाऊ कडु




नवी मुंबई / के. एच. हनवते :- दिनांक : ४ फेब्रुवारी २०२४ रोजी प्रहार जनशाली पक्ष नवी मुंबई जिल्हाअंतर्गत नेरूळ नवी मुंबई येथील रामलीला मैदान या ठिकाणी अभंग सोहळा सादर करते अभंग रिपोस्ट बॅन्ड या रंगारंग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती प्रहार जनशाली पक्ष आ. बच्चुभाऊ कडु (अध्यक्ष दिव्यांग कल्याण मंत्रालय) यांनी अभंग सोहळा विठ्ठलाचा गजर या संत परंपरेचा मनसोक्त आनंद घेतला संत रूषी यांनी आपल्या अभंग वाणीतुन समाज प्रबोधन केले. दगडाचा देव त्याला वडाराचे भेव, मातीचा देव त्याला पाण्याचं भेव, लाकडाचा देव त्याला किडे मुंग्यांचे भेव यावर आपले मिश्किल भाषेत बच्चुभाऊ कडु यांनी काव्य रचना केली राजकारणी देव त्याला मतदाराच भेव..! आसे उदगार काढून चार चार वेळेस विजय खेचून अनणारे व हिवाळी अधिवेशनात महाराष्ट्रात आमन चमन, सुख शांती पाहीजे आसेल तर अँड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांना एकबार मुख्यमंत्री बनवा..! आसे जगजाहीर प्रखड बोलणार व्यक्तीमत्व आणि सत्ताधारी असो की विरोधकांना घाम फोडणारे अपक्ष आमदार बच्चुभाऊ कडु यांनी विरोधकांवर एकच वार केला. या शानदार कार्यक्रमाचे आयोजन शोले चे दोन गब्बर जय आणि विरू अशी तुलना करून नवी मुंबई जिल्हाध्यक्ष प्रविण खेडकर आणि पनवेल जिल्हाध्यक्ष चंद्रकांत उत्तेकर यांची स्तुती करून कार्यकर्त्यामधे उत्साह आणि जोष वाढवला या कार्यक्रमास हजारोंच्या संख्येत उपस्थित जनसमुदाय यांनी या अभंग सोहळ्यात मनसोक्त आनंद व्यक्त केला.

# बौद्धजन पंचायत समितीच्या वतीने पाली भाषा प्रशिक्षण शिबीर संपन्न



मुंबई :- बौद्धजन पंचायत समितीचे सभापती, इंदू मिलचे प्रणेते, सरसेनानी आदरणीय आनंदराज आंबेडकर यांच्या आदेशानुसार तसेच कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत आणि राजेश घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वसामान्य जनमानसात पाली भाषेची जागरूकता निर्माण होऊन सर्वांनी पाली भाषा आत्मसात करून वैभवशाली धम्माचा इतिहास संशोधन करावे तसेच पाली भाषा व धम्माचा प्रचार आणि प्रसार व्हावा या उदात्त हेतूने बौद्धजन पंचायत समिती संलग्न संस्कार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने संस्कार समिती अध्यक्ष मंगेश पवार यांच्या अध्यक्षतेखाली पाच दिवसीय पाली प्रशिक्षण शिबिराचे आयोजन बौद्धजन पंचायत समिती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह, भोईवाडा, परेल, मुंबई - १२ येथे करण्यात आले होते. सदर प्रसंगी सूत्रसंचालन संस्कार समिती चिटणीस मनोहर बा. मोरे यांनी केले, सदर पाच दिवसीय प्रशिक्षण शिबिरात पाली भाषा ज्ञानदानाचे प्रशिक्षण आयु. विकास ढवळे सर यांनी दिले त्यांनी पाली भाषा, तिची बाराखडी, मुळाक्षरे, स्वर, व्यंजन, ह्रस्व दीर्घ यांची तोंडओळख, त्यांचे उच्चार, मांडणी याची अत्यंत सोप्या भाषेत माहिती देत शिबिरार्थींकडून त्याची उजळणी करून घेतली व यशस्वीरित्या शिबीर संपन्न केले, त्यासोबतच सदर प्रशिक्षण शिबिरात सहभागी झालेल्या सर्व बौद्धचार्य, बौद्धाचार्या यांना कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत आणि सरचिटणीस राजेश घाडगे यांच्या शुभहस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. सदर कार्यकामास कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत, सरचिटणीस राजेश घाडगे, चिटणीस श्रीधर साळवी, संस्कार समितीचे अध्यक्ष मंगेश पवार, चिटणीस मनोहर बा. मोरे हे उपस्थित होते त्यांनी आपले मौलिक शुभेच्छापर मते व्यक्त केली तसेच मंगेश पवार यांनी बौद्धचार्य, बौद्धाचार्या यांना प्रशिक्षिक विकास ढवळे यांनी दिलेल्या माहितीनुसार पाली भाषा आत्मसात करून पुढे तिचा प्रचार व प्रसार करा असे मार्गदर्शन केले. सरतेशेवटी सदर शिबीर यशस्वीपणे पार पाडण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे अध्यक्ष मंगेश पवार यांनी शिबीर व कार्यक्रमाची सांगता केली.

# डॉक्टरांची सेवा निष्ठाच रुग्णांच्या चेहऱ्यावर आनंद आणू शकते जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे



लातूर दि. ०५ सध्याच्या स्वार्थी आणि संकुचित जगात केवळ व्यवसायाच्या मागे न लागता डॉक्टरांची सेवेप्रती असणारी निष्ठाच रुग्णांच्या चेहऱ्यावर आनंद आणू शकते असे प्रतिपादन जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी केले. रोटरी क्लब लातूर होरायझन आणि विवेकानंद रुग्णालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने विवेकानंद रुग्णालयात हृदय रुग्ण सेवा गौरव समारंभ आयोजित करण्यात आला होता यामध्ये ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विवेकानंद रुग्णालयाचे संस्थापक पद्मभूषण डॉ. अशोक कुकडे (काका) हे होते तर विचारपीठावर रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२च्या प्रांतपाल स्वाती हेरकल, माजी प्रांतपाल रो. डॉ. विजयभाऊ राठी, डॉ. गोपीकिशन भराडिया, अध्यक्ष रो. विश्वनाथ स्वामी (सावळे), प्रोजेक्ट चेअरमन प्रा. बसवराज पणूरे आदी मान्यवर उपस्थित होते.पुढे बोलताना सोमय मुंडे म्हणाले की, कोणतेही शासन सर्व पातळीवर पोहोचू शकत नाही सेवाभावी संस्थेने पुढाकार घेतल्यास आणि सामाजिक बांधिलकी ठेवून कार्य केल्यास समाज समृद्ध आणि सुदृढ होऊ शकतो. समाजाप्रती असणारी सहानुभूती किंवा करुणा याला कृतीची जोड दिल्यास समाजाला एक चांगले वळण लागते त्यातून राष्ट्र विकास साधता येतो असेही ते म्हणाले.यावेळी रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२च्या प्रांतपाल स्वाती हेरकल म्हणाल्या की, विवेकानंद रुग्णालय हे सेवाभावी वृत्तीने रुग्ण सेवा करणारी संस्था आहे. कोणत्याही तऱ्हेचा स्वार्थ न ठेवता रुग्णही सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे या भावनेतून अविरतपणे संस्थेचे कार्य चालू आहे येथील प्रत्येक घटक रुग्णांचे समाधान आणि आनंद शोधण्याकरिता प्रयत्न करत असते ही खूप गौरवाची बाब आहे. आजकालच्या भांडवलशाही व्यवस्थेत ग्रामीण भागात दीर्घकाळ वैद्यकीय सेवा आणि आरोग्य शिबिरातून हृदय रुग्णाच्या मोफत शस्त्रक्रिया जीवनदान देणारे आहेत असेही ते त्या म्हणाल्या.आपल्या अध्यक्षीय समारोपात पद्मभूषण डॉ. अशोक कुकडे (काका) म्हणाले की, काळाच्या ओघात वैद्यकीय क्षेत्रात अमोल आग्रहाचे बदल झालेले आहेत. शासनाच्या योजना उत्तम असतात पण त्यांची अंमलबजावणी लोकांपर्यंत जाऊन पोहोचत नाही त्याकरिता सेवाभावी संस्थांनी पुढाकार घेणे गरजेचे असते. रोटरीही आंतरराष्ट्रीय सामाजिक संस्था असून या संस्थांतर्गत तळागाळातल्या लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला जातो. मराठवाडा कर्नाटकाच्या ग्रामीण भागातील ३८ लहान बालके आणि ६८ महिला पुरुष यांच्यावर ओपन हार्ट सर्जरी ही मोफत करण्यात आली ही खूप गौरवाची बाब आहे आणि केलेल्या कामाचा गौरव करणे ही सर्वांची नैतिक जबाबदारी आहे त्यामुळे प्रोत्साहन मिळते आणि समाजातही त्यांचा गौरव वाढतो. या मोहिमेत असणाऱ्या सर्व डॉक्टर्स, प्रयोगशाळा कर्मचारी आणि परिचर यांचे रोटरीने सत्कार केला याचा मला आनंद आहे.यावेळी डॉ. शितल गटागट, डॉ. सारंग गायकवाड, डॉ. प्रवीण लव्हाळे, डॉ. चंद्रशेखर औरंगाबादकर, डॉ. नितीन येळीकर, डॉ. यतीन्द्र अष्टपुत्रे, डॉ. प्रमोद तोष्णीवाल, डॉ. अश्विनी जाधव, डॉ. आरती अष्टपुत्रे, डॉ. श्याम कुलकर्णी, डॉ. कल्याणी सास्तुरकर, नेताजी भुईवार, दत्ता पळसे आणि शिवाजी उपळे यांचा मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन गुणगौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विजयभाऊ राठी यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. रत्नाकर बेडगे यांनी तर आभार डॉ. गुणवंत बिराजदार यांनी मानले.या कार्यक्रमाला डॉ. हरिप्रसाद सोमाणी, डॉ. माया कुलकर्णी, प्राचार्य डॉ. संजय गवई, महादेव पांडे, नीलकंठ स्वामी, बालासाहेब सूर्यवंशी, ज्योती मंगलगे, नानक जोधवानी यांच्यासह विवेकानंद रुग्णालयातील सर्व डॉक्टर्स आणि कार्यालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# किनवट येथे यश फाउंडेशन कडून अवयव दान चळवळीची पायाभरणी:

किनवट / प्रतिनिधी.शेख शौकत :- अवयवदान हेच खरे श्रेष्ठदान या उक्तीला अनुसरून गोकुंदा तालुका किनवट येथील यश फाऊंडेशनने अवयव दानाच्या जागृतीसाठी मोहीम उघडली असून ५ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या उपजिल्हा रुग्णालय गोकुंदा येथील मोफत आरोग्य शिबिरामध्ये अवयव दान जनजागृती मोहीम कार्यक्रमांमध्ये ३ जणांनी यश फाऊंडेशनकडे अर्ज भरले आहेत. यामध्ये प्रा. शिवाजी गायकवाड इंजिनिअर रंजीत चव्हाण, बालाजी मेश्राम यांचा अवयव दान करणारा मध्ये समावेश आहे. व्हॉट्सअप, फेसबुक आदी समाज माध्यमांवरून चालविलेल्या या मोहीमेला आता यश येत असून अवयव दानासाठी यश फाऊंडेशनकडे चौकशी करण्यात येत आहे. बदलत्या काळामध्ये अवयव दानाचे महत्त्व अधोरेखित झाले असून अनेक सुज्ञ नागरिकांना यासाठी पुढे येत असून आता समाजात अवयव दानाची चळवळ जोर धरू लागली आहे. परंतु, याबद्दल जनतेत गैरसमज, अंधश्रद्धा व जागृतीचा अभाव असल्याने अडचणी येत आहेत. त्यामुळेच उपजिल्हा रुग्णालय गोकुंदा येथील वैद्यकीय अधीक्षक मनोज गडसिंग यांच्या मार्गदर्शनाखाली यश फाउंडेशनचे अध्यक्ष बबन वानखेडे व सहसचिव प्रशांत काळे यांनी अवयव दान चळवळ पुढे नेण्यासाठी कंबर कसली असून त्यांच्या अवयदानासाठी कार्य करणाऱ्या यश फाऊंडेशनने जनजागृती अभियानाला सुरूवात केली आहे. यावर्षी १३ ऑगस्ट २०२३ रोजी अवयव दान दिनाचे औचित्य साधून फाउंडेशनचे अध्यक्ष बबन वानखेडे, मराठा सेवा संघ तालुकाध्यक्ष प्रा. दगडू दगडू भरकड यांनी देहदान केलेले आहे. येणाऱ्या १३ ऑगस्ट २०२४ पर्यंत जास्तीत जास्त अवयव दाना विषयी जनजागृती करून अवयव दान करण्यासाठी प्रवृत्त करण्याचा संकल्प यश फाउंडेशन या सामाजिक संस्थेने केला आहे.




PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE